लहान मुले वाढतात, भली बुरी
भावनांच्या तालावर,
हे आम्हाला आजवर कळलेच नव्हते!

त्यांचे मन हेलकावे घेत असते
भावनांच्या लाटांवर,
हे कळते आहे एकविसावे शतक उजाडल्यावर.

तोवर आमचे राज्य होते त्यांच्यावर
आमच्या आज्ञा,
त्यांच्यासाठी अपरिहार्यच असायच्या.

आमच्या शिस्तीत त्यांची मस्ती, आम्ही
कधीच चालू दिली नाही
आमच्या धाकात राहणे त्यांना अनिवार्य होते.

आमच्या बोटांच्या तालावर त्यांना सदैव
नाचावे लागत होते,
असेच ते घडत वा बिघडत होते.

आता आम्ही शहाणे होत आहोत आणि
मुले मोकळी
त्यांना हसताही येते हे आता कळले आहे !

उद्याची मोठी माणसे बदलतील बालविश्व ...!

२८.१.२०१९